**मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. 176/2012 संदर्भात मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि.17/02/2022 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

**जनहित याचिका क्र.176/2012 संदर्भात आढावा** घेणेसाठी श्री. राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली **दि.17/02/2022 रोजी दुपारी 3.00 वाजता बैठक** घेण्यात आली. सदर बैठकीस खालील अधिकारी यांनी उपस्थिती नोंदवली.

1. आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांचे वतीने श्री. सुरेश खाडे, अति. आयुक्त नाशिक म.न.पा.
2. श्री. कुंदनकुमार सोनवणे, उप आयुक्त(करमणूक शुल्क ) नाशिक
3. श्री. एस. आर. वंजारी, शहरअभियंता, महानगरपालिका नाशिक
4. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक यांचे प्रतिनिधी श्री. अमर दुर्गुळे, उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक
5. श्री. जयवंत बोरसे, कार्यकारी अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ नाशिक
6. श्री. यु. एफ. धर्माधिकारी, अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) महानगरपालिका, नाशिक
7. श्री. डी. एन. इंगवे, उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
8. श्रीमती मोहिनी राणे, सहाय्यक संचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
9. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
10. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

| अ.क्र. | चर्चा व दिलेल्या सुचना | कार्यवाहक विभाग/यंत्रणा/अधिकारी |
|---|---|---|
| 1. | बैठकीचे सुरुवातीस विभागीय आयुक्त यांनी उपस्थिती बाबत आढावा घेतला.<br>1.आयुक्त म.न.पा. यांनी महापालिकेची मासिक महासभा असल्याने ते बैठकीस उपस्थित राहु शकत नसल्याने प्रतिनिधी म्हणुन अति. आयुक्त यांना उपस्थित राहणेसाठी पुर्व परवानगी घेतली होती.<br>2.जिल्हाधिकारी नाशिक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नाशिक यांना मा. मंत्री महोदया यांचेकडे बैठक असल्याने ते उपस्थित राहु शकत नसल्याबाबत त्यांनी पुर्व परवानगी घेतली होती.<br>3. बैठकीस अधिक्षक अभियंता व प्रशासन (CADA) नाशिक, अधिक्षक अभियंता,जलसंपदा नाशिक विभाग, मुख्य अभियंता, निर्मिती नाशिक औष्णिक विद्युतकेंद्र एकलहरे नाशिक, तज्ञ व्यक्ती डॉ. प्राजक्ता बस्ते, प्राचार्य आर्किटेक्चर कॉलेज नाशिक , NEERI चे प्रतिनिधी तसेच प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक हे उपस्थित राहीले नाहीत.<br>वरील प्रमाणे सदस्य बैठकीस अनुपस्थित असल्याने कामकाजाचा | सर्व समिती अध्यक्ष व सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | आढावा घेणे शक्य झाले नाही याबाबत तिव्र नाराजी व्यक्त केली.<br>४. बैठकीस सर्व समिती सदस्य हजर असणे आवश्यक आहे. जर संबधीत अधिकारी यांना काही कारणास्तव हजर राहणे शक्य नसल्यास त्यांनी पुर्व संमती घेणे आवश्यक आहे. | |
| 2 | मा. उच्च न्यायालयाचे निर्णया नुसार संबधीत विभागाने कोणती कामे करावयाची आहेत. त्यापैकी किती कामे पुर्णत्वास आली आणि उर्वरीत कामे पुर्णत्वास नेण्या बाबत काय नियोजन आहे याची अद्यावत माहिती विहित नमुन्यात दि. 14.02.2022 पावेतो सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सदर बाबत संबधीतास पत्र देऊन माहिती घेण्यात यावी व त्यांनी माहिती सादर न केल्यास सदर बाब मा. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणुन देण्यात येईल असे कळविण्याच्या सुचना देण्यात आल्या. जनहितयाचिकामध्ये मा. उच्च् न्यायालयाचे दि.18 डिसेंबर,2018 आदेश खुप स्पष्ट आहेत की, विभागीय आयुक्त नाशिक यांनी गोदावरी प्रदुषण नियंत्रणा बाबत दिलेले निर्देशाची अंमलबजावणी करणे त्यांचेवर बंधनकारक आहेत. त्यामुळे या कार्यालयाकडुन देण्यात आलेलेल्या निर्देशानुसार अंमलबजावणी करणे त्याबाबत आवश्यक ती माहिती अहवाल सादर करणे अपेक्षीत आहे. म्हणुन संबधीत समिती / विभाग यांना त्यांनी न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कामकाज केले किंवा नाही. पुर्तता केली नसल्यास त्यांना पत्र देऊन कळविण्यात येऊन तसा अहवाल घेण्यात यावा. | सर्व समिती अध्यक्ष व सदस्य |
| 3 | कार्यान्वीत असलेल्या तक्रार निवारण कक्षाकडे किती तक्रारी आल्या, त्या अर्जावर योग्य कार्यवाही होते किंवा कसे ? किती तक्रारी प्राप्त झाल्या, त्यावर काय कार्यवाही झाली आणि किती तक्रारी प्रलंबित आहेत, प्रलंबित राहण्याचे कारणे काय याबाब अहवाल सादर करावा. | म.न.पा. नाशिक |
| 4 | विभागीय आयुक्त कार्यालयाकडे दाखल तक्रारीचे वाचन करण्यात आले.<br>1.गोदावरी नदीत बांधलेल्या सिमेंट कॉंक्रिटच्या भिंती बाबत श्री. निशिकांत पगारे, याचिका कर्ता यांनी दि.11.2.2022 व दि.3.02.2022 अन्वये अर्ज आयुक्त म.न.पा.नाशिक यांचेकडे अर्ज केला आहे. सदर बाबत विभागीय आयुक्त यांनी विचारणा केली. काही कामा संदर्भात NEERI ने शिफारस केली असल्यास त्यांचे शिफारशी नुसार कामे पुर्ण झालीत काय? कामे करतांना NEERI च्या शिफारशीकडे दुर्लक्ष करण्यात आले किंवा कसे ? संबधीतांनी काय पुर्तता केली | म.न.पा. नाशिक / सीईओ. स्मार्ट सिटी डेव्ह. लि. |

| | | |
|---|---|---|
| | याबाबत संबधीतांनी अहवाल सादर करावा अशा सुचना देण्यात आल्या. NEERI किंवा तत्सम यंत्रणांना जनहित याचिकेच्या अनुषंगीक कामासाठी लागणा-या खर्चाची तरतुद नाशिक महानगरपालिका यांनी करावी. | |
| | 2.गोदावरी नदीत सोडत असलेल्या सांडपाण्या बाबत श्री. निशिकांत पगारे, याचिका कर्ता यांनी दि.24.01.2022 अन्वेय या कार्यालयाकडे अर्ज केला आहे. सदर तक्रारी बाबत महापालिका प्रशासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे. नियमांचा भंग करणा-या आस्थापना व व्यक्तींवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभागाने गुन्हे दाखल करुन कारवाई करणे अपेक्षीत आहे. ज्या ठिकाणी कामकाज सुरु आहे अशा ठिकाणचे सांडपाणी नदीपात्रात जाऊ नये यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. | म.न.पा. नाशिक / महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक |
| | 3.गोदावरी नदीचे प्रदुषण रोखण्याचे दृष्टीने मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पोलीस बंदोबस्त देण्या बाबत श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ता यांनी दि.3.02.2022 अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडे अर्ज केला आहे. विभागीय आयुक्त यांनी सदर बाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेशात नमुद केल्यानुसार पोलीस संरक्षण देणे गरजेचे आहे. सदर कामात आज पावेतो काय कार्यवाही करण्यात आली याचा अहवाल देऊन स्पष्ट करण्याच्या सुचना दिल्या. | पोलीस आयुक्त नाशिक शहर |
| | एकंदरीतच गोदावरी प्रदुषण नियंत्रण संदर्भात दाखल जनहित याचिकेत मा.उच्च न्यायालयाचे दिनांक 18.12.2018 चे आदेश अत्यंत स्पष्ट आहेत की, समितीचे सर्वांनी अंमलबजावणी करावी आणि जर निर्देश मान्य नसल्यास अशा यंत्रणेने त्यासाठी मा. उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे असे बैठकीत स्पष्ट केले. | सर्व उपसमिती अध्यक्ष / सदस्य |

वरील प्रमाणे चर्चा होऊन समितीतील बहुतेक सदस्य उपस्थित नसल्याने विषयवार आढावा होऊ शकत नाही. तसा मा. उच्च न्यायालयास अहवाल सादर करण्याचे निर्देश देऊन सदरची बैठक पुढे ढकलण्यात आली.

25/02/22

(राधाकृष्ण गमे)
विभागीय आयुक्त,नाशिक

स्थळ- नाशिकरोड दि. .02.2022
क्र. कक्ष-15/क.शु./जहिया 176/2012